शनिवार दि.२४ ऑगस्ट२०२४
किंमत २ रुपये | महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : ३५५
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

# दैनिक बीड लोकनेता

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | www. lokneta.com

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

# अनुत्तरीत प्रश्नाचा जिल्हा ?

## जिजाऊंच्या मातृतीर्थ जिल्ह्यात शेकडो प्रश्नांची जणू जत्राच भरलीय

## मा.जिल्हाधिकारी,मा.जिल्हा पोलिस अधीक्षक यांची उत्तरे देतील का?

# मास्तरानं शेण खाल्लं

## बहुचर्चित बदलापूर नंतर मातृतीर्थ सिंदखेड राजा तालुक्यातील वर्डदी बु.येथे विद्यार्थिनींवर लैंगिक अत्याचार

## शिक्षकी पेशाला काळीमा;याला शिक्षक म्हणावं तरी कसे

लोकनेता न्यूज नेटवर्क


**सिंदखेड राजा | ज्ञानेश्वर बुधवत**

मातृतीर्थ सिंदखेड राजा माता जिजाऊंची जन्म भूमी. १६ व्या शतकात अन्याय अत्याचार थांबवण्यासाठी छत्रपतींना घडवणाऱ्या माता जिजाऊंचे माहेर घर म्हणून महाराष्ट्रातंच नव्हे तर देशात एक वेगळी ओळख निर्माण करून असलेला जिल्ह्याचा एक भाग. परंतु दि. २३ रोजी समोर आलेल्या प्रकारामुळे तालुक्यालाच नव्हे तर जिल्ह्यालाच कलंक लागला आहे.

काहीच दिवसा अगोदर बदलापूर येथे घडलेल्या नृशंस प्रकरणामुळे सर्वांचे लक्ष तिकडे वेधले गेले असतांना त्या नंतर जवळ जवळ ९-१० अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याचं समोर आले आहे.

तालुक्यातील वर्दडी बू. येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील हा धक्कादायक प्रकार पुढे आला आहे. सदरील प्रकार असा की, जिल्हा परिषदेच्या शाळेतील वर्ग ४ चा शिक्षक खुशालराव उगले, वय ५६ वर्ष, याने वर्गातील मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याची तक्रार किनगाव राजा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे . अप. क्र. १८३/२०२४ कलम 64(2) (f) (1) (m),65(2), 76(1) (1)B.N. 5. सह कलम 4,6,8,10,12 का.से.अ.प्र.अधि. २०१२, सहजम 3(1) (w) (1) (1) (2) (v).3 (1) (R) (s) (w), अ.जा.अ.ज.अ. प्र.का. अन्वये आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. व पुढील तपास उप विभागीय पोलिस अधीक्षक मनिषा कदम या करत आहेत.

जिजाऊंच्या जन्मभूमी मध्ये हे जे प्रकार घडत आहेत ते अतिशय लांच्छनास्पद आहेत. कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्न चिन्ह उमटलेच आहे, परंतु शालेय




विश्वात सुद्धा अविश्वासाचे वातावरण निर्माण होऊ लागले आहे. त्यामुळे पालकांच्या मनात भीती निर्माण झाली तर त्याचे परिणाम गंभीर होऊ शकतात. मुलांच्या, मुलींच्या शिक्षणाचे काय ? हा प्रश्न उपस्थित होऊ शकतो, त्यामुळे गृह खात्याने गंभीर पाऊलं उचलणं तर आवश्यक आहेच, पण शिक्षण खात्यान सुद्धा या बाबती शाळा-महाविद्यालयां मध्ये आश्र्वस्त वातावरण कसे निर्माण होईल या वर भर देणारी पावलं उचलावीत. गृह खात्यावर तर प्रश्न चिन्ह उमटलेच आहेत.जिजाऊच्या जिल्हा हा मातृतीर्थ, म्हणजे महिलांचा सन्मान करणारे



● शुकशुकाटाचे बोलके चित्र ! ●

तीर्थ. अन् त्याच जिल्हामध्ये चिमुरड्यांवर अत्याचाराचे प्रकार वाढत असल्याचे अचानक स्पष्ट होऊ लागले तर या जिल्ह्यात काय घडतं आहे? गृहखाते काय करत आहे ? हा प्रश्न तर येतोच परंतु शैक्षणिक खातं सुद्धा झोपलेलं आहे का ? हाही प्रश्न येतोच. शैक्षणिक खात्यात असे प्रकार घडत असताना कोणालाच हे माहिती नाही असं कसं म्हणता येईल ? शिक्षक अस करतोय तर हेडमास्तरला का माहिती नाही ?

आमच्या माहिती प्रमाणे मा. जिल्हा पोलिस अधीक्षक सेवा निवृत्त होण्याचा शेवटचा आठवडा आहे. आणि त्यांच्या कार्यकाळाच्या या अंतिम टप्प्यात बुलढाणा जिल्ह्यातील गृहखात्यात येवढे मोठे प्रश्न चिन्ह उपस्थित होतात ही सुद्धा विचार करण्याची गोष्ट आहे. सेवा निवृत्त होत असताना किती प्रश्न उपस्थित करून जाणार ? त्यांच्या कार्यक्षमतेवर असे प्रश्नचिन्ह उपस्थित झालेलं आहे. जिल्ह्याचं संतुलन सांभाळण्यासाठी, कायदा व शांतता सुव्यवस्थित ठेवण्यासाठी त्यांची बुलढाणा जिल्ह्यात पोस्टिंग करण्यात आली असताना किती संतुलन झालं हे आजच्या या घटनांवरून स्पष्ट होत आहे.

तसेच मा. जिल्हाधिकारी साहेब, आपल्या या मातृतीर्थ जिल्हात काय चाललं आहे ? आपणास याच्या गांभीर्याची कल्पना आहे का ? आमचे गुरुवर्य असे म्हणतात की, संतुलित विचाराची व्यक्ती, असंतुलित लोकांना संतुलित करण्यासाठी आवश्यक असते ! त्यामुळे असंतुलित विचारांच्या लोकांना संतुलित करण्यासाठी, संतुलित विचारांचे जिल्हाधिकारी इथे आणलेत ! तसेच एक संतुलित विचारांचे जिल्हा पोलिस अधीक्षक सुध्दा इथे आणलेत. पण ते हे संतुलन कायम करू शकले का ? अन् ते जर हे कायम करू शकले अस म्हणायचं असेल तर मग ही परिस्थिती का निर्माण झाली ? तेही शालेय - शैक्षणिक सारख्या पवित्र खात्यामध्ये ? याचे उत्तर कोणी द्यावे ? पालकमंत्र्यांनी द्यावे ? पालकमंत्री देतील का ? याचे उत्तर कोणी द्यावे ? खासदार देतील का ? याचे उत्तर कोणी द्यावे ? आमदार देतील का ? मा. जिल्हाधिकारी, मा. जिल्हा पोलिस अधीक्षक या परिस्थिती पासून स्वतःला वेगळं करू शकतात का ? ते काहीच जबाबदार नाहीत असं म्हणू शकतात का ?

मग पालक वर्गानं आपल्या मुलाच्या सुरक्षेच्या बाबती मध्ये कुणाकडे पाहायचे ? असे जर घडत असेल तर महाराष्ट्रामध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्याची वेळ तर आलेली नाही ना ? असाही प्रश्न उपस्थित होतो. पालकांनी आपली मुले शाळेत पाठवायची की नाही याची उत्तरे मा. जिल्हाधिकारी, मा. जिल्हा पोलिस अधीक्षक देतील का? प्रत्येक रस्त्यावर वाहने अडवून त्यांच्या कडून वसुली करणारे पोलीस अधिकारी याची संख्या थोडी जास्त दिसते. मग बंदोबस्त, शांतता व सुव्यवस्था ठेवण्यासाठी आवश्यक असलेले कर्मचारी का दिसू नयेत ? जर सडकांवरील वसुली वरंच जास्त लक्ष केंद्रित असेल तर अस घडणार नाही तर काय घडेल ? हे आंधळ्या बहिऱ्यासही कळते. त्यामुळेच हे निष्काळजी व्यवस्थापन बदलण्याशिवाय पर्याय दिसत नाही. मोठे चाक फिरते तेव्हा छोटे चाक फिरते, हा विज्ञानाचा सर्वश्रुत नियम आहे !

त्यामुळेच थोड्या जास्त कर्तव्यतत्पर अधिकाऱ्यांची येथे गरज आहे, याकडे शासनाने तातडीने लक्ष देण्याची आवश्यकता आहे हे वेगळे सांगण्याची गरज नसावी.

नागरिक व पालक वर्गामधील भिती कमी करून सुरक्षित व आश्वासक वातावरण निर्माण होणे गरजेचे आहे. मात्र त्यासाठी अत्यंत सक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती बुलढाणा जिल्ह्यात त्वरित होणे आवश्यक आहे. अन्यथा शाळा ओस पडू लागल्यास नवल वाटू नये. सूज्ञास सांगणे नलगे.

# बाभळी बंधारा बुडीत क्षेत्रातील लाभधारकांना १८८ कोटी पैकी दहा महिने झाले एक पैसाही नाही-रोशनगावकर

## आचारसंहितेपूर्वी मावेजा मिळण्याची रोशनगावकर यांची मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद | साहेबराव दुगाने**

बाभळी बंधारा कार्य कक्षेतील बुडीत क्षेत्रातील ३६५ हेक्टर जमीन धारकांच्या वाट्याला दहा महिने झाले तरी १८८ कोटी रुपयांपैकी एक पैसाही मावेजा मिळाल्या नसल्यामुळे बाभळी उच्च पातळी बंधारा कार्य कक्षेतील शेतकऱ्यांमध्ये संताप उसळला असून त्या पार्श्वभूमीवर आगामी विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वी सदरील मावेजा वितरित करण्यासाठी प्रशासनास शीघ्र गतिमान करण्याची मागणी बाबळी बंधारा कृती समितीचे कार्यालयीन सचिव शंकरराव जाधव रोशनगावकर यांनी उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा लाभक्षेत्र विकास मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली.

उच्च पातळी बाभळी बंधारा कार्यकक्षेत या जमिनी बुडीत क्षेत्र म्हणून गेल्या. त्याला गेल्या दहा वर्षापासून लाभ मिळाला नाही. त्या पार्श्वभूमीवर आमदार राजेश पवार यांनी प्रयत्नांची पराकाष्टा केली. मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सव निमित्त १६ सप्टेंबर २०२३ रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेत खाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मराठवाड्यासाठी ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. या बैठकीत बाभळी उच्च पातळी बंधारा विकासासाठी तब्बल ७३१ कोटी २० लक्ष रुपये मंजूर करण्यात आले असून त्यापैकी केवळ बुडीत क्षेत्राखाली जमिनी गेल्या त्याचा मावेजा म्हणून १८८ कोटी ६२ लक्ष रुपये प्रस्तावित



केले आहे.

या गोष्टीला दहा महिन्याचा कार्यकाळ लोटत आला असला तरी सदरील गोष्टीची पूर्तता अद्याप झाली नाही.

१६ ऑक्टोबर २०२३ रोजी शासन निर्णय काढून उपरोक्त बाभळी बंधाऱ्याच्या विकासासंदर्भात तरतूद करण्यात आली व ७७१ कोटी २२ लक्ष रुपयांची मान्यता देण्यात आली. त्या उपशीर्षाखाली मुख्य रस्ता ते बाभळी बंधाऱ्याच्या रस्त्याचे मजबुतीकरण, इमारत बांधकाम याच्यासह अनेक कामे प्रस्तावित आहेत. गोदावरी नदी काठावरील पुनर्वसित गावच्या गावठाणाच्या जमिनी ताब्यात घेऊन बाभळी बंधाऱ्याच्या माध्यमातून सौर ऊर्जा केंद्र उभारून किमान १२ तास वीज पुरवठा करणेही गरजेचे आहे.आणि हे काम शक्य आहे. पण अद्यापही त्यासंदर्भात कुठलीच कार्यवाही होत नाही म्हणून उपरोक्त पार्श्वभूमीवर बाभळी बंधारा कृती समितीचे कार्यालयीन सचिव शंकरराव पाटील रोशनगावकर यांनी उपरोक्त निवेदन उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा लाभक्षेत्र विकास मंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले.

# लोणार ते हिरडव रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे कामाची चौकशी करून कारवाई करा नगरसेवकांचा इशारा



लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार | विनायक कुटे**

लोणार शहरातील लोणी रोड पासून हिरडव रस्ता हा अत्यंत महत्त्वाचा व रहदारीचा रस्ता आहे.लोणार नगर परिषद अंतर्गत २ प्रभागाच्या मधोमध जाणारा हा मुख्य रस्ता आहे.यावर कायम रहदारी असते. सदर मुख्य रस्त्यावर शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती सुध्दा आहे त्यामुळे पुर्ण तालुक्यातील व तालुका बाहेरिल मराठवाड्यातील
शेतकरी आपला शेतमाल विक्रीसाठी बाजार समितीमध्ये येत असतात तरी या रस्त्याचे काम आपल्या मार्फत करण्यात आलेले आहे व हे काम अंदाजपत्रका नूसार झालेले नसून
निकृष्ट दर्जाचे झालेले आहे या रस्त्याच्या कामामध्ये लोणी चौकापासून साडेचारशे मीटर अंतरापर्यंत रस्ता दुभाजक व दोन्ही बाजूला आरसीसी नाल्या आहेत रस्त्याची रूंदी ६० फुट आहे म्हणजे मध्यभागापासुन तीस फुटांवर दोन्ही बाजूंच्या नाल्या यायला पाहिजे परंतु प्रत्यक्षात दोन्ही बाजूला अर्धवट नाली करण्यात आलेली असून त्यावर पुर्ण स्लब करण्यात आले नसुन रस्ता दुभाजक सुध्दा पुर्ण करण्यात आलेले नाही.नवीनच केलेल्या रोडचा एका महिन्यात वरचा कोट वाहुन गेलेला आहे व रस्त्यावर खड्डे पडले आहेत व त्याचा देयक अदा करण्यात आलेले आहे तरी सदर या गैर प्रकाराची चौकशी क्वालिटी कंट्रोल, अकोला यांच्यामार्फत करण्यात यावी व हे काम अंदाजपत्रका नूसार करण्यात यावी हे निकृष्ट दर्जाची काम करणाऱ्या कंत्राटदार व कंत्राटदाला पाठिशी घालणाय्रा अधीकाय्रावंर चौकशी करून कारवाई करण्यात यावी अशी मागणी नगरसेवक संतोष शेषराव मापारी, नगरसेविका सौ.संगिता गोविंद मापारी, नगरसेविका सौ.रंजना राजेश मापारी, नगरसेवक तौफिक कुरेशी या चारही नगरसेवकांकडून तीव्र आंदोलन करण्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

## चारोळी

**सारखाच तू बरसतो आहेस**
**उसंत घेणंच विसरतो आहेस**
**कधी उन्हात श्रावणधारा याव्यात**
**पण तूच सर्वत्र पसरतो आहेस.**

रंजना सानप
मायणी (सातारा)

# पुढील चार दिवसात पावसाचा जोर वाढणार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे (वृत्तसंस्था)**

हवामान विभागाने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार पुढील चार दिवसात राज्यात पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे हवामान विभागाने सर्व नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. याबरोबरच मध्य प्रदेश, छत्तीसगड, ओडिसा, आसाम, मेघालय, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा या भागात देखील मोठ्या प्रमाणात पावसाची शक्यता वर्तवली जात आहे. मध्य महाराष्ट्रातील काही भागांमध्ये देखील जोरदार पाऊस होऊ शकतो, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.हवामान विभागाने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार गुजरात मध्ये मोठ्या प्रमाणात पावसाचा अलर्ट देण्यात आला आहे.

# हर्षवर्धन पाटील यांचे वाढदिवसानिमित्त ६६१ बाटल्या रक्त जमा

## निरा भिमा,कर्मयोगी व हिंगणगाव येथे रक्तदान शिबीरर





लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्लीचे अध्यक्ष, माजी सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त इंदापूर तालुक्यामध्ये बुधवारी (दि.२१) विविध ठिकाणी आयोजित रक्तदान शिबिरांमध्ये एकूण ६६१ बाटल्या रक्त जमा करण्यात आले. दरम्यान, वाढदिवसानिमित्त रक्तदान केलेल्या सर्व सहकाऱ्यांचे हर्षवर्धन पाटील यांनी कौतुक करीत धन्यवाद दिले.

शहाजीनगर (ता. इंदापूर) येथे निरा भिमा कारखान्याच्या भाग्यरत्न सांस्कृतिक भवनमध्ये आयोजित रक्तदान शिबिरामध्ये ३६१ बाटल्या रक्त जमा करण्यात आले.या शिबिराचे उद्घाटन हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी लालासाहेब पवार,भाग्यश्री पाटील,विलासराव वाघमोडे,उदयसिंह पाटील,अंकिता पाटील-ठाकरे, राजवर्धन पाटील,मयुरसिंह पाटील आदी उपस्थित होते. येथे सकाळी ९ वा. पासून सायंकाळी ५ वाजेपर्यंत रक्तदान सुरू होते. या रक्तदान शिबिरासाठी अक्षय ब्लड बँक (हडपसर) पुणे यांचे सहकार्य लाभले.

महात्मा फुलेनगर (बिजवडी)येथील कर्मयोगी शंकररावजी पाटील सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावरती कारखान्याचे संचालक व युवा नेते राजवर्धन पाटील यांचे मार्गदर्शनाखाली आयोजित रक्तदान शिबीराचे उद्धघाटन संचालक छगनराव भोंगळे,सतीश व्यवहारे,अंबादास शिंगाडे यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी २३८/ बाटल्या रक्त गोळा करण्यात आले. सदर शिबिर यशस्वी करण्यासाठी कार्यकारी संचालक देवराव लोकरे, अधिकारी , कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. या शिबिरासाठी मुक्ताई ब्लड बँक इंदापूर यांचे सहकार्य लाभले. तसेच हिंगणगाव येथे हर्षवर्धन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त विजय देवकर,प्रा.राम आसबे व सहकाऱ्यांनी आसबेवस्ती येथे रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात ६१ युवकांनी रक्तदान करून हर्षवर्धन पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

### रक्तदान लोक चळवळ व्हावी -हर्षवर्धन पाटील

**आपल्या रक्तदानामुळे एखादा जिव वाचत असतो, त्यामुळे रक्तदान करणे हे पुण्य देणारे कार्य आहे. रक्तदान ही लोक चळवळ बनली पाहिजे,असे मत हर्षवर्धन भाऊ पाटील यांनी नीरा भिमा कारखाना येथे रक्तदान शिबिराच्या भेटी प्रसंगी व्यक्त केले.**

# खैरखेडा येथे आ.मुटकुळे यांच्या स्थानिक निधीतून २५ लक्ष रुपयाचे सभमनपाचे भूमिपूजन संपन्न





लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

सेनगाव तालुक्यातील खैरखेडा येथे आज दिनांक २३ ऑगस्ट रोजी हिंगोली विधानसभेचे आमदार तानाजीराव मुटकुळे यांच्या स्थानिक निधीमधून २५ लक्ष रुपयाचे सभामंडपाचे भूमिपूजन आज संपन्न झाले असून यावेळी उपस्थित भाजपा युवा नेते शिवाजीराव मुटकुळे, संतोष राव मरडे, विजयराव धाकतोडे, सरपंच रामदास मोरे, प्रकाशराव मोरे, प्रमोद इंगळे, दशरथ मुंडे, बळीराम मोरे, लक्ष्मण मोरे ,शंकरराव घायाळ, भीमराव मोरे, व आदी कार्यकर्ते मान्यवर उपस्थित होते.

# भायडी येथे शालेय व्यवस्थापन समितीची निवड करण्यात आली

लोकनेता न्यूज नेटवर्क

**दानापूर । राम शिंदे**



दिनांक २३ ८ २० २४ शुक्रवार रोजी जि प प्रा शाळा भायडी येथे पालक सभागावच्या सरपंच सौ रेखाताई केशव पाटील जंजाळ तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष समाधान पाटील वसाने यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली होती यावेळी उपस्थित पालकांमधून सर्वप्रथम आरक्षण निहाय सदस्यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.यानंतर निवड झालेल्या सदस्या मधून शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष म्हणून श्री दीपक पापालाल ब्राह्मणे यांची तर उपाध्यक्ष म्हणून सौ रूक्मण परमेश्वर फरकाडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली सदस्यामध्ये सौ आशाताई खंडेराव दसपुते,सौ कांताबाई ज्ञानेश्वर जंजाळ, सुलोचना समाधान साळवे, सौ.संगीता कडूबा वर्पे,श्री रमजान दगडू शहा,श्री नारायण सुखदेव जंजाळ,श्री विजय सखाराम जाधव यांची एक मुखाने निवड करण्यात .कार्यक्रमास गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक श्री सुरेश गोविंदराव इंगळे,श्री अरुण विठोबा बावस्कर,श्री संजय सिताराम वाघ,श्री वसंत भगवानराव देशमुख,श्री कडुबा त्रंबक दांडगे,श्रीमती सविता येडुबा कालभिले,श्रीमती सीमा यशवंतराव जाधव व इतरांनी परिश्रम घेतले..

# भाजपा महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्षा सौ.प्रणिता ताई देवरे चिखलीकर यांचे नम्र आवाहन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**




२४ ऑगस्ट २०२४ रोज शनिवार आज माझ्या वाढदिवसानिमित्त वृक्ष वल्ली आम्हा सोयरे या उक्तीप्रमाणे राजकीय सामाजिक क्षेत्रातील स्नेहीनी हार तुर्यावरील अनावश्यक खर्च टाळून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी व निसर्ग संवर्धनासाठी आपण किमान एक तरी वृक्ष लावावे आणि त्यासोबत सेल्फी काढून आपले नाव व वृक्षारोपणाची सेल्फी ९६९९२७०७९९ या व्हाट्सअप नंबरवर पाठविण्याचे त्यांनी आवाहन केले आहे.सौ.प्रणिताताई देवरे चिखलीकर यांचा २४ ऑगस्ट २०२४ चा नियोजित कार्यक्रम दौरा खालील प्रमाणे आहे.सकाळी ९ वाजता सत्य गणपती मंदिर ता.अर्धापूर येथे पुजा व दर्शन.सकाळी १० ते १२ पर्यंत साई सुभाष जनसंपर्क कार्यालय वसंतनगर नांदेड येथे उपस्थित राहणार आहेत.दुपारी १ ते ३ पर्यंत लोकनेते प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब यांचे जनसंपर्क कार्यालय बसस्थानकाच्या बाजूस लोहा येथे उपस्थित राहणार आहेत.दुपारी ४ ते सायं ६ पर्यंत लोकनेते प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब यांचे जनसंपर्क कार्यालय बसस्थानक रोड कंधार येथे उपस्थित राहणार असल्याचे त्यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना त्यांनी सांगितले आहे.

# येता संकट बालकावरी १०९८ मदत करी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम राजा**

आपल्या आजूबाजूला आपल्याला जर बालकामगार, बाल भिक्षेकरी, लैंगिक अत्याचार ग्रस्त बालके, हरवलेली बालके तसेच सापडलेली बालके, मदतीची आवश्यकता असलेली संकटग्रस्त बालके आढळल्यास अशा बालकांना त्वरित आवश्यक मदत कोठून व कशी मिळवून देता येईल, यासा्ठी कोठे संपर्क करावा याबाबत सामान्य नागरिकांमध्ये संभ्रम असतो.अशा संकटग्रस्त बालकांना त्वरित मदतीसाठी भारत सरकार, महिला व बाल विकास विभाग नवी दिल्ली व महाराष्ट्र शासनाचे महिला व बालविकास विभाग यांच्यामार्फत ० ते१८ वयोगटातील कोणत्याही प्रकारच्या अडचणीत, संकटात सापडलेल्या तसेच काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या सर्व बालकांसाठी चाईल्ड हेल्पलाईन सेवा १०९८ संपूर्ण महाराष्ट्रात कार्यान्वित आहे. या सेवेअंतर्गत संकटग्रस्त बालकांना २४७ हेल्पलाईन सेवा उपलब्ध आहे. या सेवेचा लाभ बालक स्वत: घेऊ शकतो किंवा इतर कोणीही सदर सेवेद्वारे बालकाला मदत मिळवून देऊ शकतात. त्यामुळे १०९८ या टोल फ्री क्रमांकावर कॉल करुन संकटग्रस्त बालकांना मदत करावी, असे आवाहन डॉ. प्रशांत नारनवरे, आयुक्त, महिला व बालविकास, महाराष्ट्र राज्य यांनी केले आहे.

# २४ वर्षीय तरुण माधव गोरे युवकाचा खून दिग्रस (कऱ्हाळे )येथील घटना

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**



हिंगोली तालुक्यातील डिग्रस( कऱ्हाळे) येथील माधव बाबुराव गोरे वय अंदाजे २४ वर्षे या तरुण युवकाचा खून झाल्याची घटना दिनांक २३ ऑगस्ट रोजी सकाळी सहा वाजता निदर्शनास आली.डिग्रस कऱ्हाळे येथील गोरे कुटुंबात माधव राजेश व त्यांचे आई व वहिनी राहतात.

माधव गोरे हा एकदम शांत व संयमी असून सुद्धा अशा या नवतरुण युवकाचा खून झाल्याने गावात एकच खळबळ उडाली आहे.

या घटनेची माहिती ग्रामस्थांनी हिंगोली ग्रामीण पोलीस स्टेशनला दिल्याने. या घटनेच्या तपासासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, डीवायएसपी मारोती थोरात वसमत, स्थानिक गुन्हे शाखेचे विकास पाटील, घेवारे, ग्रामीण पोलीस स्टेशनचे एपीआय रामोड, तसेच पीएसआय धुळे, ए एस आय वाठोरे,राठोड,ढेमरे,गारवे,जमदाडे, तसेच डॉग पथक, यांच्याकडून घटनेचा तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून प्राप्त झाली आहे.

# कोण काय म्हणतय यापेक्षा आपण जनतेच्या समस्या सोडवण्याला महत्त्व देतो-आ.बाळासाहेब आजबे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

मतदार संघात आजपर्यंत आपण मोठ्या प्रमाणात विकास कामे मंजूर करून आणली आहेत गावागावात विकास कामे झाली असून काही मंजूर कामांचा नारळ फोडणेचा कार्यक्रम गाव भेट दौऱ्यामध्ये होत आहे तर महाराष्ट्र शासनाच्या वतीने वेगवेगळ्या लोक कल्याणकारी योजना राबवल्या जात आहेत या योजना प्रत्येक गावामध्ये सामान्य जनतेपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे त्याचबरोबर गेल्या पाच वर्षाच्या कालावधीत आपण गावात केलेली विकासकामाचे लोकार्पण व मंजूर कामांचे उदघाटन करणे व ही कामे जनतेला माहिती व्हावेत या उद्देशाने हा गाव भेट दौरा सुरू आहे परंतु विरोधकांकडून मी करत असलेल्या मंजूर कामांच्या उद्घाटनाबाबत टीका केली जात आहे, कोण काय म्हणतंय यापेक्षा आपण जनतेच्या समस्या सोडवण्याला महत्त्व देत असून योग्य वेळी आपण सर्व आरोपांना सविस्तर उत्तर देऊ असे आमदार बाळासाहेब आजबे यांनीआष्टी तालुक्यात सलेवडगाव येथे गाव भेट दौऱ्या दरम्यान बोलताना सांगितले.

आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे कर्तव्यदक्ष आमदार बाळासाहेब आजबे यांचा गाव भेट दौरा सुरू असून शुक्रवार दिनांक २३ ऑगस्ट रोजी दौलावडगाव गणातील गाव पेठ दौरा संपन्न झाला यावेळी त्यांच्या समावेत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष काकासाहेब शिंदे ज्येष्ठ नेते हरिभाऊ दहातोंडे, परसराम आबा मराठे,महादेव डोके, माजी सभापती संतोष गुंड,पप्पू गवळी,बबन रांजणे रामहरी ठोंबरे विठ्ठल नागरगोजे यांची प्रमुख उपस्थितीत होती,पुढे बोलताना आ. आजबे म्हणाले कि गेल्या पाच वर्षाच्या कारकीर्दीमध्ये आपण मतदारसंघांमध्ये मूलभूत गरजा लक्षात घेता शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा असणारा पाणी,रस्ते विजेचा प्रश्न प्रामुख्याने हाताळत तो कसा सोडवता येईल यासाठी प्राधान्याने अनेक गावांमध्ये कोट्यवधी रुपयांचे बंधाऱ्याची कामे मंजूर केली आहेत तर पांदण रस्ता योजनेच्या माध्यमातून ५०० पेक्षा जास्त रस्त्यांचा प्रश्न मार्गी लावला आहे त्याचबरोबर इतर विकास कामे मोठ्या प्रमाणात केली .

आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार बाळासाहेब आजबे यांचा गाव भेट दौरा सध्या सुरू असून शुक्रवार दिनांक २३ ऑगस्ट रोजी अंभोरा, सालेवडगाव,दौलावडगाव, बांदखेल,केळ,पिंपळगाव, मराठवाडी,हरेवाडी या ठिकाणी ग्रामस्थांची भेटी देऊन पुढे बोलताना आमदार आजबे म्हणाले की आष्टी विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक गावात जाऊन आपण पाच वर्षात केलेली कामे त्या कामांचे लोकार्पण व उद्घाटन करून ती कामे लोकांपर्यंत पोहोचण्याचे



काम या दौऱ्याच्या निमित्ताने केली जाणार आहे, त्याचबरोबर शासनाने ज्या लोक कल्याणकारी योजना जाहीर केल्या आहेत त्या योजनांची माहिती ग्रामस्थांच्या भेटी गाठी घेण्यासाठी व गावात झालेल्या कामांची माहिती लोकांना व्हावी म्हणून हा दौरा आयोजित केला आहे लाडकी बहीण योजना,सौर पंप योजना,मोफत गॅस योजना,मुलींसाठी मोफत शिक्षण योजना यासारख्या शासनाच्या लोक कल्याणकारी योजनांचा जनतेने लाभ घ्यावा व कार्यकर्त्यांनी ही योजना त्यांच्यापर्यंत पोहोचण्याचे काम करावे शेतकऱ्यांनी कापूस व सोयाबीन पिकांचा पीक पेरा लावून घ्यावा जेणेकरून हेक्टरी पाच हजार रुपये अनुदान मिळण्यास मदत होईल, गेल्या पाच वर्षांमध्ये आपण कोणाचे वाईट होईल असे कोणतेही काम केले नाही,आमदार हा लोकांच्या समस्या सोडण्यासाठी असतो समस्या निर्माण करण्यासाठी नसतो म्हणून पाच वर्षाच्या काळात आपण भावाभावात किंवा गावागावात भांडण लावण्याचे काम केले नसून आपसातील भांडणे मिटवण्याचे प्रामाणिक काम केले आहे म्हणून गेल्या पाच वर्षांमध्ये तालुक्यामध्ये शांतता नांदत आहे, आपण गेल्या साडेचार वर्षाच्या कार्यकाळात मतदार संघात जवळपास तीन ते साडेतीन हजार कोटी रुपयांची विविध विकासकामे मंजूर करून आणून ते पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले आहेत त्यामुळे मतदारसंघातील गाव,

वाडी,वस्ती या प्रत्येक ठिकाणी विकास कामे झालेली आहेत कोणत्याही कामांमध्ये अनियमितता झालेली नसून लोकांना विकास कामे दिसत असल्यामुळेच लोकांचा पाठिंबा आपल्याला मिळत असल्याचेही आमदार बाळासाहेब आजबे यांनी यावेळी बोलतान सांगितले यावेळी राष्ट्रवादीचे काँग्रेसचे तालुकाध्यक्ष काकासाहेब शिंदे हरिभाऊ दहातोंडे परसराम मराठे संतोष गुंड सिताराम दहातोंडे चेअरमन सेवा सोसायटी विठ्ठल नागरगोजे सरपंच विठ्ठल आडसरे बबन रांजणे मामा ठोंबरे मामा महादेव डोके पप्पू गवळी दिनेश डोके रामकिसन दहातोंडे सतीश कोहक, भास्कर दहातोंडे संतोष शिंदे,बशीर मामू शेख भास्कर कराळे शिवाजी चौबे दादा शिंदे आदित्य जगताप घोडके मामा राज आटोळे बंडू खकाळ,संतोष खकाळ, ठोंबरे मामा,पप्पू गवळी अमोल ठोंबरे माजी सरपंच फसले सर आजिनाथ फसले मेजर शामराव फसले बबलू शेठ सतीश कोहक मीरा मामू शेख, लक्ष्मण फसले, अडबले मेजर, जुलेखा मिस्तरी विठ्ठल नागरगोजे, रावसाहेब दळवी सरपंच सौ कौशल्य फसले सौ सविता आडबले सौ मालन कोहक, सौ अलका अडबले उषा अडबळे, केशर आडबले, विशाल झांबरे सरपंच संपत झेंडे आबासाहेब परभणे भीमराज परभने संभाजी कोलते उपसरपंच बबलू शेठ गोविंद इथापे अशोक माळी संतोष मुळे मधुकर कोलते अशोक कोलते शिवाजी परभणे बाळासाहेब उचाळे राहुल परभणे दत्तू परभणे भाऊसाहेब परभणे यांच्यासह गणातील कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# २७ ऑगस्ट रोजी लोह्यात ओबीसीचा एल्गार

## प्रा.लक्ष्मण हाके,नवनाथ वाघमारेची जाहीर सभा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**



मराठा समाजाला वेगळे आरक्षण द्या.ओबीसी प्रवर्गातून नको अशी भूमिका घेऊन. वडीगोद्री येथे उपोषण करणारे ओबीसी नेते. प्रा. लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांची जाहीर सभा दिनांक २७ ऑगस्ट रोजी लोहा शहरात होणार असून ओबीसीचा एल्गार पुन्हा एकदा लोहा - कंधार विधानसभा मतदार संघात घोंगावणार असल्याची माहिती संयोजक मा. नगराध्यक्ष गजानन सूर्यवंशी, ग्रामीण शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. संजय पवार, माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रसेन पाटील सुरणर यांनी पत्रकार परिषदेत दिली.
य/ मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्यासाठी राज्य सरकारने अध्यादेश काढावा अशी मागणी करुन मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटिल यांनी पुन्हा उपोषण केले होते.
ओबीसी प्रवर्गातून मराठा समाजाला आरक्षण ओबीसी मधुन देऊ नका त्याचं त्यांना वेगळं आरक्षण द्यावे अशी भूमिका घेऊन ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके यांनी जालना जिल्ह्यातील वडीगोद्री येथे उपोषणाला सुरुवात करून विरोध केला होता. प्राध्यापक लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांनी केलेल्या उपोषणाला मराठवाड्यातून भरभरून प्रतिसाद ओबीसी बांधवांनी दिला. ओबीसी समाजाच्या एकत्रीकरणा साठी प्रा.लक्ष्मण हाके व वाघमारे यांनी मराठवाड्यात दौरे करत असून. दि.२७ ऑगस्ट रोजी लोहा शहरात ओबीसीची एल्गार सभा होणार आहे. राज्यातील ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का लागू नये म्हणून वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर यांनी ओबीसी समाजाला पाठिंबा दर्शवत महाराष्ट्रात आरक्षण बचाव यात्रा काढली होती .त्याच अनुषंगाने दि.२ऑगस्ट रोजी लोहा तालुक्यात आरक्षण बचाव यात्रेचे उत्स्फूर्तपणे स्वागत ओबीसी समाजाने केले होते. प्रकाश आंबेडकरांची माळाकोळी येथे भव्य जाहीर सभाही झाली होती.व लोहा शहराच्या परंपरेनुसार खारीक खोबर्याचा हार घालुन भव्य दिव्य सत्कार करण्यात आला होता बाळासाहेब आंबेडकर यांच्या आरक्षण बचाव यात्रेमुळे ओबीसी समाज जागृत झाला असून .त्यांच्यामध्ये नवचैतन्य संचारले आहे. कंधार लोहा तालुक्यातील ओबीसी समाज एकवटला पाहिजे .या करिता गजानन सूर्यवंशी डॉ.संजय पवार आणि चंद्रसेन पाटील सुरनर हे सातत्याने परिश्रम घेत असून. ओबीसीचा मोरक्या प्रा.लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांची एल्गार जाहीर सभा लोहा येथे आयोजित केली असुन ही जाहीर सभा राधाई मंगल कार्यालय येथे दुपारी १२ वा. होणार आहे. तत्पूर्वी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर चौक ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत शहरातून प्रा. लक्ष्मण हाके , नवनाथ वाघमारे यांची भव्य मिरवणूक निघणार आहे. शहरातील महामानवांना अभिवादन केल्यानंतर या मिरवणुकीचे जाहीर सभेत रूपांतर होणार आहे. या एल्गार सभेसाठी कंधार व लोहा तालुक्यातील सकल ओबीसी समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. असे अहवान लोहा नगरपालिकेचे नगराध्यक्ष गजानन सूर्यवंशी, ग्रामीण शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. संजय पवार, माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रसेन पाटील सुरनर यांनी केले आहे.या पत्रकार परिषदेसाठी माधवराव मुसळे उत्तम चव्हाण आंगत केंद्रे सुदरसीग जाधव बि एस मुंडे सर रमेश माळी युवराज वाघमारे दत्ताभाऊ शेटे केरबा केंद्रे प्रभाकर केंद्रे डॉ विश्वनाथ राठोड विश्वनाथ गरजे विठ्ठल खाडे अशोक गीते विजय केंद्रे मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# ऍड.डॉ.जगदीश गवई साहेब यांच्या प्रमुख मार्गदर्शना खाली मेहकर विधानसभा मतदारसंघात बैठक संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**



भारतीय बौद्ध महासभा राष्ट्रीय ट्रस्टी कार्याध्यक्ष तथा समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष: आद. *डॉ भिमराव यशवंतराव आंबेडकर यांच्या आदेशावरून दि. १२ऑगष्ट २०२४ रोजी झालेल्या ऑनलाईन बैठकीत महाराष्ट्रातील २९ राखीव मतदारसंघातून संविधान समर्थक सक्षम उमेदवार देण्यासाठी भारतीय बौद्ध महासभा बुलढाणा दक्षिण च्या वतीने दि. २२ ऑगस्ट २०२४ रोजी शासकीय विश्रामगृह मेहकर या ठिकाणी बैठक आयोजन करण्यात आले होते.
बैठकिच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष आद. न. ल. खंडारे हे होते. सुत्रसंचलन जिल्हा कोषाध्यक्ष आद पी. पी. वाकोडे यांनी केले. भारतीय बौद्ध महासभेचे माजी राज्यसंघटक तथा माजी जिल्हाध्यक्ष. रोहन बौद्ध आद. भिमराव तायडे आणि भारतीय बौद्ध महासभे माजी विभागीय सचिव महाराष्ट्र राज्य आद. डॉ अनिल वानखेडे. माजी विभागीय सचिव आद. सुरेश पवार आद. के. ए.अवसरमोल (माजी तालुका अध्यक्ष)आद. एस. के. साबळे (जि. सचिव पर्यटन) आद. देविदास बोर्डे (जि सचिव संरक्षण) आद. प्रा.डॉ के बी इंगळे (वं. ब. आघाडी) आद. नागवंशी संघपाल पनाड (जिल्हा नेते V.B.A) आद वसंतराव वानखेडे (जिल्हा नेतेV.B.A) आद. तु. सि. गवई (ता. संघटक) आद. अशोक काकडे (ता. अध्यक्ष देऊळगाव राजा) आद. डिव्हीजन ऑफिसर आद. भिमराव खोडके यांनी मेहकर तालुक्याचे वतीने प्रमुख पाहुण्यांना समता सैनिक दलाची मानवंदना दिली. कार्यक्रमाला मेहकर व लोणार तालुक्यातून युवा नेते अनित्य घेवंदे,दिपक पाडमुख, सिध्दार्थ अवसरमोल,प्रदिप सरदार, शाकीर भाई पठाण,दिपक अंभोरे,प्रशिस इंगळे, महेंद्र मोरे,लहू नवघरे, रामेश्वर झोटे,प्रभाकर इंगळे,राहुल पाडमुख, भुजंगराव शिरसाट,भारतीय बौद्ध महासभेचे व वंचित बहुजन आघाडी चे बहुसंख्य कार्यकर्ते हजर होते. एकंदरीत उमेदवार कसा असावा, आपल्या मतदारसंघात वंचित बहुजन आघाडी च्या व भारतीय बौद्ध महासभेच्या जास्तीत जास्त ग्राम शाखा तयार करून येणाऱ्या दोन/ अडीच महिन्यात प्रत्येक मतदारांपर्यंत पोहचून वंचित बहुजन आघाडीचा उमेदवार कसा निवडून येईल हे पाहणे आवश्यक आहे. त्यासाठी तयारीला लागावे आसाच सुर सर्व प्रमुख मार्गदर्शकांचा होता.तालुका सरचिटणीस संतोष अवसरमोल. तालुका कोषाध्यक्ष आद राजेश सरकटे ,तालुका उपाध्यक्ष बी. के. वाकोडे, तालुका सचिव प्रल्हाद वानखेडे यांनी कार्यक्रम यशस्वी केला आभार सुरेश पवार यांनी मानले.

# महाराष्ट्र नाभिक महामंडळ बीड तालुकाध्यक्ष पदी विक्रम राऊत



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र नाभिक महामंडळ संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी विक्रम राऊत यांची नियुक्ती करण्यात आली आहे. येणाऱ्या काळात समाजातील शैक्षणिक, सामाजिक, व्यवसाय याविषयी विविध उपक्रमात सहभाग घेऊन त्यांच्या अडीअडचणी सोडवण्याचा प्रयत्न करणार असल्याचे राऊत म्हणाले. या वेळी विक्रम राऊत यांना जिल्हाध्यक्ष विशाल वाघमारे यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले.यावेळी उपसंपादक नितीन क्षीरसागर, दुकान चालक-मालक संघटनेचे सुनील दोडके,शहराध्यक्ष अक्षय जाधव,मंगेश काळे आकाश सपकाळ, महेश पंडित,मंगेश झेंडे आदी जण उपस्थित होते.

# प्रति विहीर १ लाख रुपये घेऊन अधिकाऱ्यांनी केला सावळा गोंधळ

## पंचायत समिती सिंदखेड राजा अंतर्गत मंजुर झालेल्या सिंचन विहिरीची चौकशी करा-मनसे नेते शिवा पुरंदरे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**



तालुक्यामध्ये सन २०२३-२४ म.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत सामुहिक सिंचन विहीरी शेतकऱ्यांना मंजुर करण्यात आलेल्या होत्या,सदर सिंचन विहिरी मजुरांना काम मिळावे म्हणून रोजगार हमी योजनेअंतर्गत विहीर खोदकामासाठी शासनाने ठरवून दिलेल्या नियमाप्रमाणे हक्काचा रोजगार मिळतो म्हणून विहीर खोदकामासाठी मजुरांना प्राधान्य दिले जाते,परंतु शासनाचे नियम गुलदस्त्यात ठेवून कागदोपत्री मजूर दाखवून मशनरी द्वारे विहिरीचे खोदकाम केले जाते असे व्हायला नको म्हणून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने निवेदनाद्वारे खालील प्रमाणे चौकशीची मागणी केली आहे.
सदर विहिरी ह्या रोजगार हमी योजने अंतर्गत असल्यामुळे त्या मजुराकडून का करून घेतल्या जात नाही ? मजुरा ऐवजी पोकलँन्ड मशिन का वापरली जाते? बोगस मजुर दाखवून मस्टर का भरण्यात येतात ? ज्या व्यक्तीचे नावे मजूर म्हणून मस्टर वर असतात तो व्यक्ती प्रत्यक्षात मजूर म्हणून तेथे नसतो असे का ?मजुरांनी प्रत्यक्षात एकही दिवस विहीवर काम केलेले नाही तरीदेखील बिले काढण्यात आलेली आहे असे का ? सदर विहीरी मंजूर करण्यासाठी प्रति शेतकरी १ लाख रुपये घेण्यात आल्याचं निवेदनात म्हणण्यात आले आहे.
म.ग्रा.रो.ह.यो. मधील अधिकारी, कर्मचारी व गट विकास अधिकारी यांनी केलेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करून दंडात्मक कार्यवाही १५ दिवसाचे आत करावी करावी?, गट विकास अधिकारी पंचायत समिती सिंदखेडराजा यांच्या संपत्तीची चौकशी करण्यात यावी?
असे अनेक प्रश्न मनसे नेते पुरंदरे यांनी उपस्थित केले आहे. उपस्थित प्रश्नाची चौकशी व कारवाई न झाल्यास मनसेच्या वतीने अन्यत्याग आंदोलन करण्याचा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या वतीने निवेदनाच्या मार्फत गटविकास अधिकारी यांना देण्यात आला आहे.

# टू व्हीलर मेकॅनिक असोसिएशन तर्फे स्वातंत्र्य दिनानिमित्त देशभक्तीपर गीत गायन संपन्न

## नितीन वऱ्हेकर,प्रा.अरुण बुंदेले,मारोती तांबट,मनोज मोरे, अश्विन चौधरी या गायकांनी केले देशभक्तीपर गीतांचे गायन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अमरावती । प्रतिनिधी**



येथील टू व्हीलर मेकॅनिक असोसिएशन तर्फे स्वातंत्र्यदिना निमित्त देशभक्तीपर गीतांच्या गायनाच्या कार्यक्रमाचे आयोजन असोसिएशनच्या रुक्मिणी नगर येथील कार्यालयात संपन्न झाले. अध्यक्षस्थानी श्री नितीन वऱ्हेकर (अध्यक्ष, टु व्हिलर मेकॅनिक असोसिएशन) तर प्रमुख अतिथी
अभंगकार व साहित्यिक प्रा. अरुण बुंदेले,टू व्हीलर मेकॅनिक असोसिएशनचे उपाध्यक्ष श्री तेजस दुमाने,सचिव श्री संजय काळे ,सहसचिव श्री अमोल बांबल,कोषाध्यक्ष श्री मारोती तांबट होते. अध्यक्ष व प्रमुख अतिथी यांच्या शुभहस्ते स्वातंत्र्य वीरांच्या प्रतिमेचे पूजन व हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. देशभक्तीपर गीतांच्या बहारदार कार्यक्रमात अभंग गायक प्रा.अरुण बुंदेले यांनी स्वरचित स्वातंत्र्याचा दिन या अभंग गीताचे गायन सुमधुर स्वरात केले तर गायक श्री नितीन वऱ्हेकर,श्री मारोती तांबट,श्री मनोज मोरे,श्री अश्विन चौधरी यांनी देशभक्तीपर गीतांचे दमदार गायन केले.या सुमधुर आवाजातील देशभक्तीपर गीतांमुळे श्रोते मंत्रमुग्ध झाले होते.
याप्रसंगी टू व्हीलर मेकॅनिक असोसिएशनचे सदस्य सर्व श्री गजानन पांडव,योगेश शिंदे, इरशाद शेख अत्ताऊल्ला खॉ, अमोल देवळे,मो.फारूक मो.आसीफ,गजानन चौधरी, फिरोज अ.अब्दुल सत्तार,योगेश बोने,आनंद सरोदे,योगेश बहिरूवाले,प्रशांत महल्ले, गोपाल गणोरकर,दिलीप पोटफोडे, किशोर काळे,महेश देशमुख, गणेश तांबट,विशाल पिहुलकर, मुकेश पिंजरकर, विशाल शाहू, मुन्ना गुप्ता यांची प्रमुख उपस्थिती होती.रसिकांनी देशभक्तीपर गीताच्या गायनाचा आनंद घेतला.

# राजकुंवर महाविद्यालय वाघरुळ येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ दिन साजरा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**जालना । ज्ञानेश्वर बुधवत**

राजकुंवर महाविद्यालय वाघरुळ ज. येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ दिन साजरा करण्यात आला .या शुभप्रसंगी उपस्थित महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.राजेंद्र जायभाये यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थित प्रा.अनिल शिंदे, प्रा. विजय देशमुख ,प्रा.चंद्रमुनि जोगदंड, प्रा.प्रवीण गाडेकर, प्राध्यापिका. सरला डोईफोडे, प्रा. समाधान सरोदे प्रा.अरुण गिते श्री भगवान जोगदंड श्री. संतोष जाधव श्री. गजानन जोगदंड व इतर कर्मचारी उपस्थित होते.

# दौंड तालुक्यातील मळद येथील माध्यमिक विद्यालयातील लैंगिक अत्याचार प्रकरणी सुप्रियाताई सुळे यांनी दिली भेट

## आरोपींना २९/०८/२०२४ पर्यंत पोलीस कोठडी





आरोपी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

दौंड तालुक्यातील मळद येथील माध्यमिक विद्यालयातील अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार प्रकारामुळे दौंड तालुका हादरला असून, शाळेतील मुलीवर लैंगिक अत्याचार झाला असून,अत्याचार करणारे हे त्याच शाळेतील शिक्षक असून त्यांच्यावर पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे.
या शाळेच्या ठिकाणी मळद गावात बारामती लोकसभेच्या खासदार सुप्रियाताई सुळे यांनी भेट दिली असून,त्यांनी सांगितले की अशा नराधामांना फाशीची शिक्षा झाली पाहिजे.
आणि त्यासाठी मी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटणार आहे. या नराधमांना कडक कयदा करण्याची गरज आहे असे त्या म्हणाल्या.संबंधित आरोपींना २९/०८/२०२४ पर्यंत पोलीस कस्टडी मिळाली आहे अशी माहिती दौंड पोलिसांनी दिली.

दैनिक लोकनेता



# प्रकाश भगनुरे पाटील यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या कडे सुपूर्द केली ८१ विधानसभेच्या मतदान केंद्रांची यादी

## लोहा-कंधारमधून निवडणूक लढविण्याची अपेक्षा केली व्यक्त

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

मराठा समाज व चळवळींच्या विविध आंदोलनांमध्ये गेल्या २५ ते ३० वर्षांपासून सक्रिय असणारे जेष्ठ पत्रकार आणि संपादक प्रकाश भगनुरे पाटील यांनी मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. यावेळी प्रकाश भगनुरे पाटील यांनी महाराष्ट्रातील ८१ विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रांची यादी मनोज जरांगे पाटील यांच्याकडे सुपूर्द केली आणि लोहा कंधार विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्याची अपेक्षाही व्यक्त केली.

प्रकाश भगनुरे पाटील हे गेल्या ३० वर्षांपासून पत्रकारितेत असून त्यांनी विविध वृत्तपत्रांत काम केले आहे. गेल्या सतरा वर्षांपासून ते स्वतःचे दैनिक भूमिसत्ता हे वर्तमानपत्र चालवत आहेत. त्यांनी विकासाच्या अनेक प्रश्नांना वाचा फोडली आहे. ते एक आघाडीचे पत्रकार असून आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून भगनुरे पाटील यांनी सामाजिक, शैक्षणिक,राजकीय, वैद्यकीय आणि साहित्य क्षेत्रात खूप काम केले आहे. भगनुरे पाटील हे उत्तम लेखक, कथाकार व स्तंभ लेखक आहेत. त्यांचे भाषेवर प्रभुत्व असून त्यांचा लोहा-कंधार विधानसभा, मुखेड विधानसभा तसेच नांदेड जिल्ह्यासह मराठवाड्यात मोठा जनसंपर्क आहे. त्यांच्या या अनुभवाचा फायदा लोहा-कंधार विधानसभेच्या निवडणुकीत निश्चित होणार आहे.प्रकाश भगनूरे पाटील हे कंधारचे भूमिपुत्र असून ते उच्च विद्या विभूषित आहेत. २००५ पासून सरपंचकीच्या माध्यमातून त्यांनी तालुक्यातील हाडोळी (ब्रह्मशेठ) या मूळ गावी अनेक विकासाची कामे केली आहेत. लोकसभा, विधानसभा,जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत त्यांनी स्वतः त्या-त्या मतदारसंघात फिरून आपले उमेदवार निवडून आणण्याचा कसोशीने प्रयत्न केला आहे. सर्वच राजकीय पक्षात त्यांचे सलोख्याचे संबंध असून अनेकांसोबत त्यांची बैठकही आहे. लोहा व मुखेड या दोन्ही विधानसभा मतदारसंघात सध्या नव्या चेहऱ्याची गरज आहे.जुन्या पुढार्यांना जनता कंटाळली असून मतदार नव्या उमेदवाराची वाट पाहत आहेत. प्रकाश भगनुरे पाटील हे तरुण आणि उमदे व्यक्तिमत्व आहे. ते निश्चितच मतदारसंघाला न्याय देतील,अशी अपेक्षा जनता व्यक्त करत आहे. विधानसभेचे उमेदवार म्हणून प्रकाश भगनुरे पाटील हे रिंगणात उतरले तर त्यांची लढत प्रचंड धनशक्ती विरुद्ध जनशक्ती, अशी होणार आहे.आपल्या शांत आणि संयमी स्वभावातून भगनुरे पाटील यांनी अनेक माणसे जोडली आहेत. हीच माणसे विधानसभेच्या निवडणुकीत जीवाचे रान करायला तयार आहेत.पत्रकारितेच्या माध्यमातून भगनुरे यांनी तळागाळातील लोकांना नेहमीच मदत केली आहे. छत्रपती संभाजीनगरातील घाटी रुग्णालयात मराठवाडा व परिसरातील सुमारे पाच ते साडेपाच हजार रुग्णांवर




त्यांनी उपचार करण्यासाठी मदत केली आहे. कोणत्याही क्षणी लोकांच्या मदतीला जाऊन जाणारे हे व्यक्तिमत्व मतदारसंघासाठी फायद्याचे ठरणार आहे.प्रकाश भगनुरे पाटील यांनी छावा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष स्व. प्रा. देविदास वडजे, अ.भा. मराठा महासंघाचे स्व.डॉ. शशिकांत पवार, मराठा महासंघाचे संस्थापक पुरुषोत्तम खेडेकर,अखिल भारतीय छावा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष स्व.अण्णासाहेब जावळे पाटील, शिवसंग्रामचे संस्थापक स्व. विनायकराव मेटे,छावा संघटना महाराष्ट्रचे संस्थापक अध्यक्ष प्रा.चंद्रकांत भराट, बुलंद छावा संघटनेचे सचिव सुरेश वाकडे पाटील यांच्यासह अनेक मराठा संघटनाच नसून अनेक सामाजिक संघटनांमध्येही विविध आंदोलने उपोषणे व मोर्चामध्ये सहभाग नोंदवला आहे. मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या विविध आंदोलने, उपोषणे आणि मोर्चांमध्ये हीरीरीने सहभाग नोंदवला आहे. अण्णासाहेब जावळे पाटील यांना छत्रपती संभाजी नगरात पहिली पत्रकार परिषद घेऊन देण्यात भगनुरे पाटलांचा सिंहाचा वाटा आहे.प्रकाश भगनुरे पाटील यांनी लोहा आणि मुखेड या दोन्हीही विधानसभा मतदारसंघातून काँग्रेसची उमेदवारी मागितली असून त्यांचे नाव चर्चेत आहे. काँग्रेसचा नवा चेहरा म्हणून पक्षश्रेष्ठी विचार करेल,अशी अपेक्षा जनतेला आहे. प्रकाश भगनुरे पाटील यांनी मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांची अंतरवली (सराटी) येथे भेट घेतली. भगनुरे पाटील यांनी जरांगे पाटलांकडे महाराष्ट्रातील ८१ विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रांची यादी सुपूर्द केली आहे. कोणत्या विधानसभा क्षेत्रात किती मतदान केंद्र आहेत? कोणत्या गावात किती मतदान केंद्र आहेत? कोणत्या मतदान केंद्रावर किती मतदान आहे? याची सर्व माहिती या याद्यांमध्ये आहे. श्री. मनोज जरांगे पाटलांनी जर विधानसभेचे उमेदवार उभे केले तर अभ्यास व नियोजनासाठी या याद्या निश्चितच उपयोगी पडणार आहेत. भेटीच्या चर्चेत प्रकाश भगनुरे पाटील यांनी लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघांमध्ये माझा संपर्क असून मी विधानसभेची निवडणूक लढवू इच्छितो. आपला पाठिंबा आणि आशीर्वाद माझ्या पाठीशी असू द्यावा, मी आपल्या विश्वासास पात्र राहील,अशी अपेक्षा जरांगे पाटलांकडे व्यक्त केली आहे. जरांगे पाटलांच्या भेटीवेळी भगनुरे पाटील यांच्यासोबत जरांगे पाटलांचे खंदे समर्थक व शिवबा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष गणेश दादा शिंदे, सचिन हावळे पाटील,सतीश जगताप पाटील, शिवसंग्रामचे लक्ष्मण नवले पाटील, बालासाहेब भगनुरे पाटील, गजानन चवडे पाटील,स्वाभिमानी संभाजी ब्रिगेडचे तिरुपती भगनुरे पाटील,पंकज उदरभरे, संदेश भगनुरे, देगलूर-बिलोली राखीव विधानसभेचे इच्छुक उमेदवार अरुण दापकेकर, दिगंबर मेकाले, संदीप डिकळे पाटील, जगन्नाथ डिकळे पाटील,रोहित भगनुरे यांच्यासह लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघातील अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# विधानसभा जिंकण्यासाठी सूक्ष्म नियोजन करा-ॲड.प्रियदर्शी तेलंग

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम राजा**

होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या तयारीच्या अनुषंगाने वंचित बहुजन आघाडी उमरखेड व महागाव तालुक्याच्या वतीने संजोग भवन उमरखेड येथे विधानसभा क्षेत्रातील प्रमुख पदाधिकारी व बूथ प्रमुख यांची आढावा बैठक घेण्यात आली या बैठकीमध्ये उपस्थितांना मार्गदर्शन करताना जिल्ह्याचे निरीक्षक ड.प्रियदर्शी तेलंग यांनी उमरखेड विधानसभा जिंकण्याच्या दृष्टिकोनातून प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्ते बुध वरील प्रतिनिधी यांनी अतिशय सूक्ष्म नियोजन करून विधानसभेच्या तयारीला लागावे अशा सूचना केल्या पुढे बोलत असताना त्यांनी नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये प्रस्थापित दोन आघाड्या समोर असताना सुद्धा वंचित




बहुजन आघाडीने उमरखेड विधानसभेमध्ये चांगल्या पद्धतीचे प्रदर्शन केल्याचे बोलले आहे माजी खासदार ड.बाळासाहेब आंबेडकर यांनी महाराष्ट्रभर काढलेल्या ओबीसी आरक्षण बचाव यात्रेची चर्चा गाव पातळीवरच्या ओबीसी घटकापर्यंत पोहोचवण्याच्या सूचना उपस्थित कार्यकर्त्यांना दिल्या यावेळी राज्याचे उपाध्यक्ष तथा उमरखेड तालुक्याचे सुपुत्र ड.गोविंद दळवी यांनी सुद्धा कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप जिल्हा अध्यक्ष पांडुरंग मेश्राम यांनी केला. कार्यक्रमास जिल्हा महासचिव डी के दामोधर, सचिव उत्तमराव ढोले ,संघटक विजय लहाने ,उमरखेड तालुकाध्यक्ष संबोधी गायकवाड, महागाव तालुका अध्यक्ष प्रल्हाद नवसागरे, पुसद तालुका अध्यक्ष बुद्ध रत्न भालेराव यांची प्रमुख उपस्थिती होती , कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्ह्याचे महासचिव डी के दामोधर यांनी आयोजनाच्या मागची भूमिका विशद केली, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तालुका महासचिव एस के मुनेश्वर यांनी तर आभार प्रदर्शन राजेश घुगरे यांनी केले.आत्माराम हापसे, पी एल आठवले,आनंदराव वाहूळे, भीमराव हापसे, गणेश पाईकराव ,भीमराव कोकणे,संतोष गायकवाड ,सुनील राठोड ,गजानन इंदल जाधव, , विष्णू हापसे, मरीबा गायकवाड, शिवशंकर कदम, प्रसन्न बर्डे, अनाथपिंडक खडसे ,अमोल कांबळे, तौफिक अहमद, शेख दानिश, यांच्यासह मतदारसंघातील अनेक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उमरखेड महागाव तालुक्यातील वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

# माजी राज्यमंत्री श्री सुबोध सावजी यांची धाड येथे भेट





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

लोणार तालुक्यातील ग्राम धाड येथे दिनांक २२ ऑगस्ट गुरुवार रोजी श्री सुबोध भाऊ सावजी माजी महसूल राज्यमंत्री माजी पालकमंत्री अकोला बुलढाणा जिल्हा व खुशालराव गायकवाड लोणार यांनी

लोणार तालुक्यातील धाड येथे भेट दिली असता गावातील धाड येथील प्रल्हादराव सांगळे आयाजी शेजुळ बाबाराव सांगळे शाहीर बेळकर भगवान शेजुळ श्रमा शेजुळ आसाराम ताठे हरिभाऊ वाकळे भिकाजी वाकळे गौतम शेजुळ ज्ञानबा ताठे गडू वाकळे बाबासाहेब शेजूळ बंडू सांगळे ज्योतिबा जुमडे ग्रामपंचायत सदस्य किशोर जाधव यांनी हार शाल नारळ देऊन स्वागत केले गावच्या समस्यांबाबत चर्चा केली.याप्रसंगी

गावातील नागरिक उपस्थित होते.

# महाविकास आघाडीची लोणार तालुका बंदची हाक



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

महाविकास आघाडीच्या माध्यमाने लोणार बंदची हाक देण्यात आली याविषयीचे निवेदन तहसीलदार व पोलीस निरीक्षक यांना देण्यात आले.

महाराष्ट्रात होणाऱ्या चिमुकल्या मुलींवर व महिलांवर अत्याचार करून दोषी मोकाट फिरत आहेत, राज्य शासनात बसलेले निष्क्रिय गृहमंत्री त्यांना अभय देत आहे

त्यामुळे महाराष्ट्राच्या गृहारर्पीीूररच्या निषेधार्थ महाविकास आघाडीच्या माध्यमातून महाराष्ट्र बंदची हाक देण्यात आलेली आहे त्या अनुषंगाने लोणार तालुका महाविकास आघाडीच्या सर्व पदाधिकारी यांच्या माध्यमातून दिनांक २४ ऑगस्ट २०२४ रोजी लोणार तालुका व शहर बंद ठेवले जाणार आहे करिता सर्व जनतेने सहकार्य करावे असे आवाहन काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राजूभाऊ मापारी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे, काँग्रेस ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष गजानन खरात, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष संदीप मापारी,आम आदमी पार्टीचे जिल्हा संघटक सचिव गणेश सोळंके, शिवसेनेचे शहर प्रमुख गजानन जाधव, काँग्रेसचे शहर अध्यक्ष समद शेख, माजी नगराध्यक्ष भूषण मापारी, उपनगराध्यक्ष बादशाह खान, माजी नगराध्यक्ष साहेबराव पाटोळे, नगरसेवक तौफिक कुरेशी, शहर उपप्रमुख लूकमान कुरेशी, अंबादास इंगळे, माऊली मोरे यांच्यासह सर्व महाविकास आघाडीच्या पदाधिकारी यांनी केले आहे.

# सर्व समाजघटकांना न्याय देणारे एकनाथ शिंदे हे इतिहासातील एकमेव धाडसी मुख्यमंत्री-आ.रायमूलकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

शेतकऱ्यांना एक रुपयात पीकविमा,कृषिपंपाची वीजबिल माफी, कृषि खात्याच्या विविध योजना, महिलांसाठी लाडकी बहीण योजना, बचतगटांसाठी अर्थसहाय्य, युवकांसाठी योजना, ग्राम व शहर विकासासाठी कोट्यावधी रुपयांच्या विक्रमी योजना देणारे एकनाथ शिंदे हे राज्याच्या इतिहासातील एकमेव धाडसी मुख्यमंत्री आहेत, असे विचार आमदार संजय रायमूलकर यांनी व्यक्त केले.



मेहकर लोणार तालुक्यातील निवृत पोलीस पाटलांचा निरोप समारंभ आणि शिंदे सरकारने पोलीस पाटील यांच्या मानधनात केलेल्या भरीव वाढीबद्दल आमदार रायमूलकर यांचा सत्कार सुलतानपूर येथील वेदांत आश्रम येथे आज आयोजित करण्यात आला होता.त्यावेळी संजय रायमूलकर यांनी आपल्या भाषणात वरील विचार व्यक्त केले.माजी सभापती डॉ. हेमराज लाहोटी, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रा.बळीराम मापारी, कैलास पारीख, वामनराव झोरे,सरपंच संघटना अध्यक्ष अरुण दळवी, मनोज भानापुरे, भारत शिंदे, रामेश्वर भिसे, नायब तहसीलदार राठोड, ठाणेदार लोणार श्री मेहेत्रे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

पाहुण्यांचे स्वागत मधुकर पाटील, पंजाबराव धांडे, राजीव भानापुरे, अनिल बोबडे, अशोक धान्डे, राजु मुळे यांनी केले.यावेळी निवृत २२ पोलीस पाटलांचा सत्कार आमदार रायमूलकर यांच्या हस्ते करण्यात आला.संघटनेतर्फे रायमूलकर यांचा सत्कार करून शासनाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.आपल्या भाषणात संजय रायमूलकर पुढे म्हणाले की, मुख्यमंत्री शिंदे यांनी गेल्या अडीच वर्षात गतिमान व धडसी निर्णय घेऊन जनतेचे हित साधले.सर्व घटकांसाठी मोठे निर्णय घेतले.गेली अनेक वर्षे पोलीस पाटलांच्या मानधनात वाढ करण्याचा प्रश्न मुख्यमंत्र्यांनी सोडवून साडेसहा हजार वरून ते १३ हजार ५०० केले. मेहकर मतदारसंघात ३ हजार ७०० कोटींपेक्षा अधिक रकमेची विकासकामे झाली.मतदारसंघ एक कुटुंब आहे, असे सांगून रायमूलकर म्हणाले की, केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली १५ वर्षे लोकांची सेवा करता आली, हे माझे भाग्य आहे. तंटामुक्ती समिती आणि पोलीस पाटील, सरपंच यांच्या माध्यमातून आणि प्रशासनाच्या समन्वयातून गावातील वाद गावातच मिटविण्याचा प्रयत्न व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.जिल्ह्यात १२४० पैकी सातशेपेक्षा पोलीस पाटलांच्या जागा रिक्त आहेत. मेहकर तालुक्यात ३१ जागा रिक्त आहेत,असेही रायमूलकर म्हणाले. यावेळी डॉ. हेमराज लाहोटी, गजानन खोकले, भारत शिंदे, पारीख, प्रा. बळीभाऊ मापारी यांची भाषणे झाली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरद धोटे यांनी केले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904